**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार, दिनांक १७ जून २०२४**

**ठळक बातम्या**

1. **पश्चिम बंगालच्या न्यु-जलपायगुडी स्थानकाजवळ सियालदाहला जाणाऱ्या कांचनजंगा एक्सप्रेसच्या भीषण अपघातात, ८ जणांचा मृत्यू, ५० जण जखमी.**
2. **राज्य पोलीस दलातील शिपाई भरती २०२२-२३साठी नागपुरात मैदानी चाचणी परीक्षा १९ जून पासून.**
3. **ईद-उल-अजहाचा सण सर्वत्र उत्साहात साजरा.**
4. **नागपूरच्या दिघोरी नाक्यावर काल मद्यधुंद कार चालकाने ९ जणांना चिरडले, २ जणांचा मृत्यू, ७ जण जखमी.**

**आणि**

5. **नागपुरात दमदार पावसाची हजेरी, उकाड्यापासून किंचित दिलासा.**

*****

कांचनजंगा एक्सप्रेस

पश्चिम बंगालच्या न्यु-जलपायगुडी स्थानकाजवळ सियालदाहला जाणाऱ्या कांचनजंगा एक्सप्रेसला मालगाडीनं पाठीमागून धडक दिल्यानं झालेल्या भीषण अपघातात आतापर्यंत ८ जणांचा मृत्यू झाल्याचं वृत्त असून या अपघातात ५० जण जखमी झाले आहेत. सिलिगुडीमध्ये झालेल्या या अपघातातील मृतांमध्ये ३ रेल्वे कर्मचाऱ्यांचाही समावेश असल्याची माहिती रेल्वे बोर्डाच्या अध्यक्ष जया वर्मा-सिन्हा यांनी दिली आहे. सर्व जखमींवर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनास्थळावरचं बचाव कार्य पूर्ण झाल्याचंही त्यांनी सांगितलं. मालगाडीनं सिग्नलकडे दुर्लक्ष केलं आणि काचंनजंगा एक्सप्रेला पाठीमागून धडक दिल्याची माहिती रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी दिली. या धडकेमुळे गाडीचे काही डबे रुळावरुन घसरले आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी या अपघाताबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं असून, जखमींना लवकर बरं वाटावं, अशा सदिच्छा दिल्या आहेत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून या प्रकरणी रेल्वेमंत्र्यांशी चर्चा केली आहे. या अपघातातल्या मृतांच्या कुटुंबाला प्रधानमंत्री मदत निधीतून २ लाख रुपये तर जखमींना ५० हजार रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे. रेल्वेकडून मृतांच्या कुटुंबाला १० लाख रुपये, गंभीर जखमींना अडीच लाख रुपये आणि किरकोळ जखमींना ५० हजार रुपये देण्याची घोषणा रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी केली आहे. अपघातग्रस्त लोकांच्या नातेवाईकांच्या मदतीसाठी रेल्वेनं वेगवेगळ्या स्थानकांवर मदतकक्ष सुरु केले आहेत. या अपघातामुळं काही रेल्वेगाड्यांचे मार्ग बदलण्यात आले आहेत.

पोलीस शिपाई भरती

महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील रिक्त पदे भरण्यासाठी मैदानी चाचणी परीक्षा १९ जून पासून संपूर्ण राज्यभरात सुरु होणार आहे. नागपूर शहर आयुक्तालय इथली  पोलीस शिपाई भरती २०२२-२०२३ करिता एकूण ३४७ पदांकरिता एकुण २९ हजार नऊशे स्त्यांशी अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यामध्ये पुरूष उमेदवारांचे २२ हजार दिन्शे एकोणसत्तर अर्ज, महिला उमेदवारांचे ७ हजार सातशे ७९३ अर्ज आणि तृतीयपंथी उमेदवारांचे ०५ अर्ज प्राप्त झाले आहे. तसेच नागपूर कारागृह शिपाई भरती २०२२-२०२३ साठीच्या २५५ पदांकरिता एकूण ५५ हजार २९७ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यामध्ये पुरूष उमेदवारांचे ३९ हजार ६७४ अर्ज  तर महिला उमेदवारांचे १५ हजार ६१८ अर्ज आणि तृतीयपंथी उमेदवारांचे ०५ अर्ज प्राप्त झाल्याची माहिती आज नागपुर शहर, पोलीस आयुक्त डॉ.रविंद्रकुमार सिंगल यांनी पत्रकार परिषदेत दिली. पोलिस भरती २०२२-२३ मधे ज्या उमेदवारांनी एका पेक्षा जास्त पदांकरिता अर्ज केले आहेत आणि त्यांची मैदानी चाचणी एकाच दिवशी आली असेल अशा उमेदवारांना किमान ४ दिवस अंतराने वेगवेगळ्या तारखा दिल्या जातील. उमेदवारांना काही शंका असल्यास त्यांनी raunak.saraf@mahait.org यावर ईमेल करावा असेही त्यांनी आवाहान केलं आहे.

ईद उल अजहा

ईद उल अजहा हा सण देशभरात उत्साहानं साजरा होत आहे. देशाच्या विविध भागात आज ईदगाह तसंच मशिदीत नमाज अदा करुन एकमेकांना शुभेच्छा देण्यात आल्या. दिल्लीत जामा मशिद, फतेहपुरी मशिद आणि शाही इदगाहमध्ये

नमाज अदा करण्यात आली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीयांना 'इद उल अजहा'च्या शुभेच्छा दिल्या आहेत. ईद उल अजहा हा त्यागाचं स्मरण करण्याचा दिवस आहे आणि आनंद वाटून घेण्याचा संदेश त्यातून मिळतो, असं राष्ट्रपती मुर्मू यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. ईद-उल अजहा या खास दिवसाच्या निमित्तानं समाजात एकोपा आणि सुसंवाद वाढीला लागावा, अशा सद्भावना पंतप्रधान  नरेंद्र मोदी यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात व्यक्त केल्या आहेत. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जनतेला शुभेच्छा दिल्या आहे. दरम्यान, नागपूरसह विदर्भात विविध मशिदीत ईद निमित्त विशेष नमाज आणि अन्य धार्मिक कार्यक्रम आयोजिण्यात आले. मध्यवर्ती कारागृहात, बकरी ईद कार्यक्रमाचं आयोजन कारागृहातील प्रार्थना भवन इथं जामिया अरेबीय इस्लामीया या संस्थेच्या माध्यामातून करण्यात आलं. बकरी ईद चा नमाज अदा केल्यानंतर कारागृह अधीक्षक वैभव आगे यांनी कैद्यांना बकरी ईद च्या शुभेच्छा दिल्या.

आंतरराष्ट्रीय योग दिन

येत्या २१ जून रोजी साजरा होणाऱ्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची तयारी जगभरात मोठ्या उत्साहात सुरु आहे. यानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भद्रासनावरील एक चित्रफित सामाजिक माध्यमांवर सामायिक केली आहे. भद्रासनाचा सराव केल्याने सांधे मजबूत होतात, गुडघेदुखी कमी होते, पोटाच्या समस्या दूर ठेवण्यासाठी देखील हे आसन उपयुक्त असून, याचा सर्वांनी सराव करण्याचं आवाहन पंतप्रधानांनी केलं आहे. दरम्यान, सलग तिसऱ्या कार्यकाळासाठी पदाची शपथ घेतल्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आकाशवाणीवरच्या 'मन की बात' या कार्यक्रमाच्या १११व्या भागात या महिन्याच्या अखेरच्या रविवारी, येत्या ३० जूनला देशवासियांशी संवाद साधणार आहेत.

चंद्रकांत पाटील

आठ लाखापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबातल्या मुलींना मोफत शिक्षण देण्याची राज्य शासनाची योजना असून, याबाबतचा शासन आदेश लवकरच जारी

करण्यात येईल, असा विश्वास उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केला आहे. ते काल पुण्यात एका कार्यक्रमात बोलत होते. दरम्यान, या योजनेसंदर्भात सरकारने केवळ घोषणा केली असून, अंमलबजावणी झाली नसल्याची टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे. मंत्र्यांनी ही घोषणा केल्यामुळे गांभीर्य आहे, तसंच विद्यार्थी, पालक आणि महाविद्यालयांमध्येही संभ्रमाचं वातावरण असल्याचं सुळे यांनी ट्विट संदेशात म्हटलं आहे.

अपघात

नागपुरात काल रात्री 12.30 वाजता वाठोडा पोलीस ठाण्याचा हद्दीत येणाऱ्या दिघोरी नाक्यावर मद्यधुंद अवस्थेत असलेल्या कार चालकान फुटपाथ वर झोपलेल्या 9 जणांना चिरडलं. या अपघातात 2 जणांचा मृत्यू झाला असून 7 जण जखमी झाले अशी माहिती आमच्या प्रतिनिधीन दिली आहे. त्यांचावर शासकिय रूग्णालयात उपचार सुरू आहे. या प्रकरणी वाठोडा पोलीसांनी 6 युवकांना ताब्यात घेतले असून हे सर्व जण मद्यधुंद होते अशी महिती पोलीसांनी दिली आहे. याशिवाय हे सर्व आरोपी वैद्यकीय शिक्षण घेणारे होते असं सांगण्यात येत आहे.

हवामान

नागपुरात आज दुपारी वीजांच्या कडकडाटासह दमदार पावसाने हजेरी लावली. संध्याकाळी 4 नंतर पावसाला सुरवात झाली. बहुप्रतीक्षित पाऊस पडल्याने उकड्यापासून नगपूरकरांना दिलासा मिळाला आहे. जोरदार वारा आणि विजांमुळे शहराच्या काही भागात काही काळ वीजपुरवठा खंडित झाला होता. दरम्यान पाऊस आणि विजांपासून सुरक्षित राहण्याची खबरदारी घेण्याच्या सूचना हवामान विभागाने दिल्या आहे. आगामी काही तासात विदर्भातील अमरावती, अकोला, भंडारा आणि वर्धा जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह सोसाट्याचा वारा वाहू शकतो. या दरम्यान हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. तत्पुर्वी, वर्धा जिल्ह्यातील काही भागात पावसाने आज हजेरी लावली आहे. या पावसामुळे वर्धा जिल्ह्यातील नागरिकांना उकाड्यापासून दिलासा मिळाला आहे. तर शेतकऱ्यांची शेतीची कामे पूर्ण झाली असून शेतकरी पेरणी साठी तैयार झालेला आहे. पाऊस

असाच सुरू राहला तर लवकरचं जिल्ह्यात पेरणीचा वेग वाढेल, असं मत तज्ज्ञांनी व्यक्त केलं आहे.

प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या उत्तर प्रदेशातल्या वाराणसीतल्या  कार्यक्रमात प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी अंतर्गत २० हजार कोटी रुपयांहून अधिक रक्कमेचा १७ वा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यांत जमा करणार आहेत. याचा लाभ नऊ कोटी २६ लाख शेतकऱ्यांना होणार आहे. या योजनेअंतर्गत आतापर्यंत ११ कोटींपेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना तीन लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कमेचा लाभ झाला आहे. याच कार्यक्रमात पंतप्रधानाच्या हस्ते स्वयं सहाय्यता गटातील ३० हजारांहून अधिक महिलांना कृषी सखी या प्रमाणपत्राचं वाटप करणार आहेत.

रवी राणा

अमरावती लोकसभा मतदारसंघात अनेक विकासकामं केलेली असतानाही महायुतीच्या उमेदवार नवनीत राणा यांचा  पराभव झाल्यानं त्याचं चिंतन आपण करत असल्याचं स्वाभीमानी पक्षाचे नेते, आमदार रवी राणा यांनी आज वार्ताहर परिषदेत सांगितलं.  महाविकास आघाडीन अपप्रचार, खोटी आश्वासनं, खोटी प्रलोभनं देऊन जनतेची दिशाभूल केली असा आरोपही राणा यांनी यावेळी  केला.

भरारी पथकाची कार्यवाही

खरीप हंगामाला सुरवात झाली असून भंडारा कृषी केंद्रात बियाणे खत विक्री साठी उपलब्ध झाले आहेत. शेतकऱ्यांना चांगल्या प्रतीचे बियाणे खत उपलब्ध व्हावे त्याकरिता भरारी पथकाची तपासणी सुरू असून यामध्ये आतपर्यंत १०० पेक्षा जास्त कृषी केंद्राची तपासणी झाली आहे. तपासणी दरम्यान कृषी केंद्रात भाव फलक - दर्शनी भागात न लावणे, साठा रजिस्टर अद्यावत न ठेवणे, विक्री साठी उपलब्ध असलेले बियाणे कंपनीचे प्रमाणपत्र परवान्यात समाविष्ट नसणे, रासायनिक खत पोस मशीन वरून न विक्री करता ऑफलाईन विक्री करणे इत्यादी त्रुटी तपासणी दरम्यान निदर्शनांस आल्या असून, सात कृषी केंद्रावर कारवाई करण्यात आली आहे.

राज्याचे पर्यटक

सिक्कीम येथील लाच्युन्ग व्हॅली इथं मुसळधार पावसामुळे दरड कोसळली असून याठिकाणी अडकलेल्या पर्यटकांमध्ये महाराष्ट्रातील काही पर्यटकांचा समावेश आहे. या घटनेची तात्काळ दखल घेऊन राज्यातील पर्यटकांना सुखरूप परत आणण्याचे निर्देश राज्य प्रशासनाला दिले आहेत, त्यानुसार या सर्व पर्यटकांना वायुदलाच्या विशेष हेलिकॉप्टरने गंगटोक इथ सुरक्षितस्थळी हलविण्यात येणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या एक्स खात्यावरून दिली आहे.

*****